180

महाराष्ट्र शासन,
आदिवासी विकास विभाग

# "रोजगार व स्वयंरोजगार विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या आदिवासी उमेदवारांसाठी रोजगार स्वयंरोजगार मार्गदर्शन व प्रशिक्षण योजनेचे" मूल्यमापन

## मूल्यमापन अहवाल वर्ष-२००४-०५

आयुक्त,
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य; पुणे ४११ ००१

२००५

महाराष्ट्र शासन,
आदिवासी विकास विभाग

# "रोजगार व स्वयंरोजगार विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या आदिवासी उमेदवारांसाठी रोजगार स्वयंरोजगार मार्गदर्शन व प्रशिक्षण योजनेचे" मूल्यमापन

## मूल्यमापन अहवाल वर्ष-२००४-०५

आयुक्त,
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००१

२००५

# प्रस्तावना

भारतीय घटनेने प्रतिकूल परिस्थितीत जीवन जगत असलेल्या लोकांना सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रातील हक्क दिले आहेत. भारतीय घटनेच्या ३३५ व्या कलमान्वये अनुसूचित जाती जमातीच्या व्यक्तींना केंद्र व राज्य शासनाच्या सेवेतील पदे भरण्याच्या प्रक्रियेत आरक्षण ठेवण्यात आले आहे. तरी मानवी विकासाच्या स्थितीचा विचार केला असता, सर्वसामान्यांपेक्षा अनुसूचित जमातींच्या लोकांचा विकास इतर सर्वसामान्य लोकांच्या विकासाच्या तुलनेत सातत्याने अतिशय कमी आहे. मागील कालावधीत, आदिवासी जमातीचे पात्र उमेदवार उपलब्ध होत नसल्यामुळे त्यांच्याकरीता आरक्षित असलेली पदे वर्षानुवर्षे रिक्त राहिलेली आहेत. महाराष्ट्र शासनाने सन १९८४ मध्ये पहिल्या वेळेस अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना विविध स्पर्धा परिक्षांची माहिती देऊन परीक्षेची तयारी करण्याकरीता, आदिवासी जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी रोजगार व स्वयंरोजगार प्रशिक्षण केंद्रांची स्थापना केली. ही योजना प्रभावीपणे राबविल्यास महाराष्ट्र राज्यातील आदिवासी जमातींच्या जीवनात मोठया प्रमाणात सुधारणा होण्यास मदत होईल. सध्या अशा प्रकारची आठ केंद्रे महाराष्ट्रात कार्यरत आहेत. या योजनेचे मूल्यमापन करुन त्यात सुधारणा सुचविण्याचा हा एक प्रयत्न आहे.

ठिकाण : पुणे

दिनांक :

(वाय.पी.एस.तोमर)
आयुक्त,
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

# अ नु क्र म णि का



| अ.क्र. | प्रकरण क्रमांक | विषय | पृष्ठे | |
|---|---|---|---|---|
| | | | पासून | पर्यंत |
| (१) | प्रकरण १ ले | प्रास्ताविक | ४ | |
| (२) | प्रकरण २ रे | आदिवासी जमातींकरीता रोजगार व स्वयं रोजगार मार्गदर्शन व प्रशिक्षण योजना | ५ | ६ |
| (३) | प्रकरण ३ रे | कार्यपध्दती | ७ | ८ |
| (४) | प्रकरणे ४ थे | मूल्यमापनांतर्गत आढळून आलेल्या बाबी | ९ | ३० |
| | अ) | योजनेची प्रसिध्दी | ९ | |
| | ब) | प्रशिक्षणाचा प्रशिक्षणार्थींवर झालेला प्रभाव | १० | २१ |
| | क) | प्रशिक्षण घेत असलेल्या प्रशिक्षणार्थींचे निरीक्षण | २२ | २६ |
| | ड) | प्रशिक्षण केंद्रामध्ये असलेल्या सोयी सुविधा | | |
| | अ | इमारत | २६ | - |
| | ब | ग्रंथालय | २७ | २८ |
| | क | इतर आवश्यक सुविधा | २९ | - |
| | ड | करमणूक साहित्य | ३० | - |
| | इ | कर्मचारी वर्ग | ३० | ३२ |
| (५) | प्रकरण ५ वे | सूचना/शिफारशी | ३३ | ३४ |

# प्रकरण क्र. १

# प्रास्ताविक

आयुक्त, रोजगार व स्वयंरोजगार विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांना, आदिवासी उमेदवारांसाठी रोजगार व स्वयं रोजगार मार्गदर्शन केंद्र योजनेचे मूल्यमापन करण्याबाबत विनंती केली. त्यानुसार योजनेचे मूल्यमापन करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

मूल्यमापनाचे उद्देश खालीलप्रमाणे आहेत :-

१) योजना ज्या उद्देशासाठी सुरु केली तो उद्देश साध्य झाला आहे कां ?

२) योजनेमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे कां ?

***

# प्रकरण क्र. २

# आदिवासी उमेदवारांसाठी रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन व प्रशिक्षण केंद्र योजना

शासकीय/निमशासकीय कार्यालये, महामंडळे व संस्थांमधील पदे भरण्याकरीता आदिवासी उमेदवारांसाठी पदे राखीव ठेवणेबाबत तरतुद आहे. ही पदे स्पर्धात्मक परिक्षेद्वारे भरण्यात येतात. महाराष्ट्र शासनाने आदिवासी विद्यार्थ्यांकरीता आठ "रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन व प्रशिक्षण केंद्रे" स्थापन करण्याचा निर्णय घेतला असून ही आठ केंद्रे खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | केंद्राचे नांव | जिल्हा | स्थापना वर्ष |
|---|---|---|---|
| १. | रावेर | जळगांव | १९८४ |
| २. | अचलपूर | अमरावती | १९८४ |
| ३. | कळवण | नाशिक | १९८४ |
| ४. | देवरी | गोंदिया | १९८५ |
| ५. | चंद्रपूर | चंद्रपूर | १९८५ |
| ६. | मंचर | पुणे | १९८५ |
| ७. | किनवट | नांदेड | १९८५ |
| ८. | गडचिरोली | गडचिरोली | १९९४ |

केंद्रे स्थापन करण्याचे उद्देश खालीलप्रमाणे आहेत :-

१) आदिवासी विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक परिक्षेची माहिती देणे.

२) आदिवासी विद्यार्थी, स्पर्धात्मक परिक्षेत यशस्वी व्हावे यासाठी त्यांना मार्गदर्शन देऊन तयार करणे.

**योजनेमधील ठळक वैशिष्टये खालीलप्रमाणे आहेत.**

१) माध्यमिक/उच्च माध्यमिक व पदवीधर परीक्षा उत्तीर्ण झालेल्या आदिवासी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देणे.

२) तीन महिन्यांच्या पूर्ण कालावधीचे प्रशिक्षण देणे.

३) तीन महिन्यांच्या प्रशिक्षण कालावधीत साधारणपणे २०-२५ आदिवासी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले जाते.

४) प्रशिक्षण कालावधीत प्रतिमहा रु.३७५/- विद्यावेतन प्रशिक्षणार्थींना देण्यात येते.

५) प्रशिक्षणासाठी विषय तज्ञ व्याख्यात्यांस बोलावण्यात येते आणि त्यांना प्रतितास रु.४०/- प्रमाणे मानधन देण्यात येते.

६) प्रशिक्षण व मार्गदर्शन केंद्रात खालीलप्रमाणे कर्मचारी वृंद कार्यरत आहे :-

| अ.क्र. | पदनाम | वर्ग/श्रेणी | पदसंख्या |
|---|---|---|---|
| १ | उपप्रादेशिक सेवायोजन अधिकारी | वर्ग-२ | १ |
| २ | कनिष्ठ सेवायोजन अधिकारी | वर्ग-२ | १ |
| ३ | लिपीक | वर्ग-३ | १ |
| ४ | टंकलेखक | वर्ग-३ | १ |
| ५ | शिपाई | वर्ग-४ | १ |

***

# प्रकरण क्र. ३

# कार्यपध्दती

३० जानेवारी २००५ ते १० फेब्रुवारी २००५ या कालावधीत मूल्यमापनासाठीच्या सर्वेक्षणाचे काम करण्यात आले.

कार्यरत असलेल्या ८ माहिती आणि मार्गदर्शन केंद्रांपैकी खालील ५ केंद्रे मूल्यमापनासाठी निवडण्यात आली :-

| अ.क्र. | केंद्राचे नांव | जिल्हा |
|---|---|---|
| १ | अचलपूर | अमरावती |
| २ | गडचिरोली | गडचिरोली |
| ३ | देवरी | गोंदिया |
| ४ | किनवट | नांदेड |
| ५ | चंद्रपूर | चंद्रपूर |

रोजगार व स्वयंरोजगार विभाग, मुंबई यांच्याकडून दुय्यम सांख्यिकी माहिती घेण्यात आली.

प्रशिक्षण केंद्राकडून माहिती गोळा करण्यासाठी ४ प्रश्नावली तयार करण्यात आली होती.

**१) प्रश्नावली क्र. १** : रोजगार व स्वयंरोजगारांना प्रशिक्षण देणाऱ्या प्रशिक्षण केंद्राच्या प्रमुखाकडून माहिती गोळाकरण्यासाठी प्रश्नावली क्र.१ तयार करण्यात आली असून त्यातील खालील प्रमुख बाबींची माहिती त्यांच्याकडून संकलीत केली आहे.

१) केंद्रासाठी असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांचा तपशील.

२) प्रशिक्षण केंद्रात असलेल्या सोयी सुविधांचा तपशील.

३) मागील पाच वर्षात झालेल्या खर्चाचा तपशील.

४) प्रशिक्षणार्थ्यांची सविस्तर माहिती.

५) प्रशिक्षणार्थीना प्रशिक्षण देणे आणि त्यांना नोकरी मिळवून देणे, याबाबत प्रशिक्षण केंद्राकडून करण्यात आलेल्या प्रयत्नांचा तपशील.

**२) प्रश्नावली क्र. २** : प्रशिक्षणार्थीकडून माहिती गोळा करण्यासाठी प्रश्नावली क्र.२ तयार केली असून यात, प्रशिक्षण कालावधीत मध्येच प्रशिक्षण सोडून गेलेले आणि प्रशिक्षण पूर्ण केलेले परंतु नोकरी अगर इतर उद्योग व्यवसाय करत नसलेले प्रशिक्षणार्थी यांची खालील प्रमुख बाबींची माहिती गोळा केली आहे.

१) प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर नोकरी मिळविण्यासाठी प्रशिक्षणार्थ्यांनी काय प्रयत्न केले ?

२) प्रशिक्षण व मार्गदर्शन केंद्रांकडून मदतीच्या अनुषंगाने असलेले प्रशिक्षणार्थ्यांचे मत.

३) प्रशिक्षणार्थ्यांने प्रशिक्षण पुर्ण न करता मध्येच प्रशिक्षण सोडून जाण्याचे कारण.

**३) प्रश्नावली क्र. ३** : प्रशिक्षण पूर्ण करुन नोकरीस लागलेल्या प्रशिक्षणार्थींकडून माहिती घेण्यासाठी प्रश्नावली क्र.३ तयार केली असून यातील खालील प्रमुख बाबींची माहिती गोळा केली आहे.

१) प्रशिक्षणार्थीच्या नोकरीबाबत तपशील.

२) प्रशिक्षणार्थीला नोकरी मिळण्यासाठी प्रशिक्षणाचा किती उपयोग झाला याविषयी प्रशिक्षणार्थींचे मत

३) प्रशिक्षण केंद्रात सुधारणा करण्याबाबत प्रशिक्षणार्थींचे मत.

**प्रश्नावली क्र. ४** : प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण घेत असलेल्या प्रशिक्षणार्थ्यांची माहिती घेण्यासाठी प्रश्नावली क्र. ४ तयार करण्यात आली असून यात प्रामुख्याने असलेल्या बाबी खालीलप्रमाणे आहेत.

१) प्रशिक्षणार्थीचा प्रशिक्षण घेण्याविषयीचा उद्देश

२) प्रशिक्षणार्थीच्या प्रशिक्षण केंद्रांकडून असलेल्या अपेक्षा

३) प्रशिक्षण केंद्राविषयी प्रशिक्षणार्थ्यांच्या असलेल्या अपेक्षा पूर्ण होतात का ?

४) रोजगार व स्वयं रोजगार मार्गदर्शन केंद्रात, सुधारणा करण्याविषयी असलेले प्रशिक्षणार्थ्यांचे मत

प्रश्नावली क्र.१ मधील माहिती प्रशिक्षण केंद्राकडून घेण्यासाठी मूल्यमापन अभ्यास करणाऱ्या गटाने ५ प्रशिक्षण केंद्रास भेट दिली. भेटी दिलेल्या प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण घेत असलेल्या प्रशिक्षणार्थ्यांसमवेत गटाने चर्चा आयोजित केली आणि प्रशिक्षणास हजर असलेल्या प्रशिक्षणार्थ्यांकडून प्रश्नावली क्र. ४ भरुन घेण्यात आली.

ज्या प्रशिक्षणार्थींनी प्रशिक्षण पूर्ण केलेले आहे, परंतु प्रशिक्षणानंतरही अद्याप बेरोजगार आहेत, तसेच ज्या प्रशिक्षणार्थ्यांनी अर्धवट प्रशिक्षण करुन मध्ये सोडून दिले, अशा उपलब्ध प्रशिक्षणार्थ्यांच्या प्रत्यक्ष भेटी घेऊन त्यांच्याकडून प्रश्नावली क्र. २ मध्ये माहिती भरुन घेतली आहे.

प्रशिक्षण पुर्ण केल्यानंतर जे प्रशिक्षणार्थी नोकरीस लागले अशा प्रशिक्षणार्थ्यांस सर्वेक्षण करणाऱ्या गटाने, संपर्क साधून प्रश्नावली क्र.३ मधील माहिती त्याच्याकडून भरुन घेतली आहे.

ज्या प्रशिक्षणार्थ्यांनी प्रशिक्षण अर्धवट सोडले अशा २६ उमेदवारांकडून आणि ज्या उमेदवारांनी प्रशिक्षण पूर्ण केले आहे परंतु अद्यापि बेरोजगार आहेत अशा ६३ उमेदवारांकडून प्रश्नावली क्र. २ भरुन घेतली आहे.

ज्या उमेदवारांना प्रशिक्षणोत्तर नोकरी प्राप्त झाली आहे, अशा २५ उमेदवारांकडून प्रश्नावली क्र. ३ मध्ये माहिती भरुन घेतली आहे.

४५ प्रशिक्षण घेत असलेल्या प्रशिक्षणार्थ्यांची माहिती प्रश्नावली क्र.४ मध्ये घेतली आहे.

# प्रकरण क्र. ४

# मूल्यमापनांतर्गत आढळून आलेल्या बाबी

## अ) योजनेची प्रसिध्दी :

आयुक्त, रोजगार व स्वयं रोजगार विभाग, मुंबई यांनी योजनेच्या प्रसिध्दी विषयी माहिती दिली आहे की, प्रशिक्षण केंद्रातील प्रत्येक प्रशिक्षण सत्रात प्रशिक्षणाच्या सत्राबाबत स्थानिक वर्तमानपत्र, रेडिओ, दूरदर्शन केंद्र, जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार केंद्र आणि एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांचेमार्फत प्रसिध्दी देण्यात येते, जेणेकरुन पात्र आदिवासी प्रशिक्षणार्थी प्रशिक्षण सत्रास येऊ शकतील. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांचेकडून शालांत परीक्षा उत्तीर्ण/पदवीधर आदिवासी विद्यार्थ्यांच्या याद्या मागविल्या जातात, या याद्यांमधून पात्र प्रशिक्षणार्थ्यांची यादी तयार करण्यात येते व त्यांना मुलाखतीसाठी पाचारण करण्यात येते. मुलाखतीस बोलाविलेल्या सर्व विद्यार्थ्यांना रोजगार उपलब्धतेबाबत संपूर्ण माहिती सांगण्यात येते आणि प्रशिक्षणाबाबतची माहिती देऊन प्रशिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहित करण्यात येते. प्रशिक्षणासाठी शैक्षणिकदृष्टया पात्र असलेले प्रशिक्षणार्थी प्रशिक्षणासाठी प्रवेश घेतात. प्रशिक्षणार्थ्यांची निवड करण्याकरिता जिल्हा स्तरावर समिती स्थापित करण्यात आली असून यात समाविष्ट असलेले अधिकारी खालीलप्रमाणे आहेत.

१) उपसंचालक, रोजगार व स्वयं रोजगार विभागीय मुख्यालय.

२) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प

३) जिल्हा रोजगार व स्वयं रोजगार मार्गदर्शन अधिकारी

असे निदर्शनास येते की, योजनेची प्रसिध्दी पुरेशा प्रमाणात देण्यात येत नाही. वर्तमानपत्रातून दिलेली प्रसिध्दी ही एक साधारण पध्दती आहे. तथापि अचलपूर जिल्हा अमरावती यांनी हॅण्डबील छापून त्याचे आदिवासी गावात मोठया प्रमाणात वितरण केले आहे, याप्रमाणे प्रशिक्षण योजनेबाबत प्रशिक्षण आयोजित केलेल्या तारखेसह पुरेशा प्रमाणात प्रसिध्दी देणे गरजेचे आहे, यासाठी खालील सुधारणा प्रस्तावित करण्यात येत आहेत.

१) जेथे प्रशिक्षण केंद्र कार्यरत आहेत तेथे योजनेच्या माहितीची पुस्तिका/हॅण्डबील तयार करुन विविध शैक्षणिक संस्था, जिल्हा परिषद, पंचायत समित्या, ग्राम पंचायत, मागासवर्गीय वसतिगृहे, जिल्हाधिकारी कार्यालये, उपविभागीय कार्यालये, तहसील कार्यालये, आणि जिल्हा स्तरावर असलेल्या इतर विविध कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर योजनेच्या माहितीची पुस्तिका/हँडबील तयार करुन लावण्यात यावीत.

२) रेडिओ, टी.व्ही., केबल ऑपरेटर यांच्याद्वारे योजनेच्या माहितीची प्रसिध्दी देण्यात यावी.

३) ग्रामसेवकांनी प्रशिक्षण योजनेची हॅण्डबील/पुस्तिका त्यांच्या ग्रामपंचायत व गावचावडी कार्यालयातील नोटीस बोर्डवर लावावीत आणि ग्रामपंचायत बैठकीत व ग्रामसभेत सदर प्रसिध्दीचे वाचन करावे अशा सुचना, पंचायत समितीकडून ग्रामसेवकांना द्याव्यात आणि पंचायत समितीने, ग्रामसेवकानी याप्रमाणे कार्यवाही केली का ? याची खात्री करुन घ्यावी.

४) ग्रामपंचायतीमधील तलाठी व शिक्षक यासारख्या इतर यंत्रणेद्वारे सुध्दा प्रशिक्षण योजनेची प्रसिध्दी देण्यात यावी.

ब) **प्रशिक्षणाचा प्रशिक्षणार्थ्यांवर झालेला प्रभाव**

आयुक्त, रोजगार व स्वयं रोजगार विभाग, मुंबई यांनी अशी माहिती दिली आहे की, आठही केंद्रांत सन १९९९-२००० ते २००३-२००४ या कालावधीत ३४४९ प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षणासाठी प्रवेश दिला. त्यापैकी ११९८ एवढे उमेदवार प्रशिक्षण मध्येच अर्धवट सोडून गेले. उर्वरित २२५१ इतक्या उमेदवारांनी प्रशिक्षण पूर्ण केलेले आहे. सदर बाबीची वर्षनिहाय माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | वर्ष | एकूण प्रवेशित उमेदवारांची संख्या | प्रशिक्षण पूर्ण केलेल्या उमेदवारांची संख्या | प्रशिक्षण अर्धवट करुन सोडून दिलेल्या उमेदवारांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | १९९९-२००० | ८०२ | ४८० | ३२२ |
| २ | २०००-२००१ | ६६० | ४३२ | २२८ |
| ३ | २००१-२००२ | ७०७ | ५०० | २०७ |
| ४ | २००२-२००३ | ६६० | ३१८ | ३४२ |
| ५ | २००३-२००४ | ६२० | ५२१ | ९९ |
| | **एकूण** | **३४४९** | **२२५१** | **११९८** |

सन १९८६-८७ ते २००३-२००४ या कालावधीत प्रशिक्षणासाठी प्रवेश घेतलेल्या प्रशिक्षणार्थ्यांची, ५ प्रशिक्षण केंद्रांकडून माहिती घेण्यात आली ही पाच केंद्रे १) अचलपूर (जिल्हा अमरावती), २) गडचिरोली (जिल्हा गडचिरोली) ३) किनवट (जिल्हा नांदेड), ४) देवरी (जिल्हा गोंदिया), ५) चंद्रपूर (जिल्हा चंद्रपूर) याप्रमाणे आहेत. गडचिरोली प्रशिक्षण केंद्राची स्थापना १९९४ मध्ये झालेली असल्याने त्या केंद्राची माहिती १९९४ वर्षापासून घेतलेली आहे. १७ वर्षात (गडचिरोली सोडून) एकूण ७४५१ विद्यार्थ्यांनी प्रशिक्षणाकरीता प्रवेश घेतला. यापैकी १७२८ विद्यार्थी मध्येच प्रशिक्षण सोडून गेले आणि ५७२३ प्रशिक्षणार्थ्यांनी त्यांचे प्रशिक्षण पूर्ण केले. प्रशिक्षण पूर्ण केलेल्यापैकी १०१५ प्रशिक्षणार्थ्यांना नोकरी मिळाली असा अहवाल आहे. पाच केंद्रांची वर्षनिहाय माहिती खालीलप्रमाणे देण्यात आली आहे.

# वर्षनिहाय व केंद्रनिहाय सर्व केंद्रांच्या प्रशिक्षणार्थींची माहिती दर्शविणारा तक्ता

| अ. क्र. | वर्ष | केंद्राचे नांव | प्रवेशित प्रशिक्षणार्थींची एकूण संख्या | प्रशिक्षण पूर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थींची संख्या | अर्धवट प्रशिक्षण सोडून गेलेल्या प्रशिक्षणार्थ्यांची संख्या | प्रशिक्षणोत्तर नोकरी प्राप्त झालेल्या प्रशिक्षणार्थ्यांची संख्या | बेरोजगार असलेल्या प्रशिक्षणार्थ्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | १९८६-८७ | १. किनवट, जि.नांदेड | ७२ | ५५ | १७ | - | ५५ |
| | | २. चंद्रपूर | ५३ | ४५ | ८ | ३६ | ९ |
| | | ३. देवरी, जि.गोंदिया | ७८ | ७० | ८ | ५ | ६५ |
| | | ४. अचलपूर, जि. अमरावती | ७८ | ७१ | ७ | ३७ | ३४ |
| | | **एकूण** | **२८१** | **२४१** | **४०** | **७८** | **१६३** |
| २. | १९८७-८८ | १. किनवट,जि.नांदेड | ५८ | ३९ | १९ | २४ | १५ |
| | | २. चंद्रपूर | ८५ | ७१ | १४ | ४९ | २२ |
| | | ३. देवरी, जि.गोंदिया | ८२ | ७७ | ५ | ५ | ७२ |
| | | ४. अचलपूर, जि. अमरावती | ७९ | ७७ | २ | २१ | ५६ |
| | | **एकूण** | **३०४** | **२६४** | **४०** | **९९** | **१६५** |
| ३. | १९८८-८९ | १. किनवट,जि.नांदेड | ७४ | ४७ | २७ | २० | २७ |
| | | २. चंद्रपूर | ८५ | ७३ | १२ | ४२ | ३१ |
| | | ३. देवरी, जि.गोंदिया | ८७ | ८६ | १ | ९ | ७७ |
| | | ४. अचलपूर, जि. अमरावती | ७७ | ७० | ७ | २४ | ४६ |
| | | **एकूण** | **३२३** | **२७६** | **४७** | **९५** | **१८१** |
| ४. | १९८९-९० | १. किनवट,जि.नांदेड | ७८ | ४४ | ३४ | १९ | २५ |
| | | २. चंद्रपूर | ८७ | ५६ | ३१ | ४० | १६ |
| | | ३. देवरी, जि.गोंदिया | ८७ | ८७ | - | १९ | ६८ |
| | | ४. अचलपूर, जि. अमरावती | ८४ | ६८ | १६ | २८ | ४० |
| | | **एकूण** | **३३६** | **२५५** | **८१** | **१०६** | **१४९** |
| ५. | १९९०-९१ | १. किनवट,जि.नांदेड | ८७ | ५३ | ३४ | १० | ४३ |
| | | २. चंद्रपूर | ९४ | ६२ | ३२ | २६ | ३६ |
| | | ३. देवरी, जि.गोंदिया | ८३ | ८२ | १ | १२ | ७० |
| | | ४. अचलपूर, जि. अमरावती | ७७ | ५४ | २३ | १३ | ४१ |
| | | **एकूण** | **३४१** | **२५१** | **९०** | **६१** | **१९०** |
| ६. | १९९१-९२ | १. किनवट,जि.नांदेड | १०० | ७५ | २५ | ५ | ७० |
| | | २. चंद्रपूर | १०७ | ८९ | १८ | २५ | ६४ |
| | | ३. देवरी, जि.गोंदिया | ९४ | ८५ | ९ | २ | ८३ |
| | | ४. अचलपूर, जि. अमरावती | ९२ | ७४ | १८ | ८ | ६६ |
| | | **एकूण** | **३९३** | **३२३** | **७०** | **४०** | **२८३** |

| अ. क्र. | वर्ष | केंद्राचे नांव | प्रवेशित प्रशिक्षणार्थींची एकूण संख्या | प्रशिक्षण पूर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थींची संख्या | अर्धवट प्रशिक्षण सोडून गेलेल्या प्रशिक्षणार्थ्यांची संख्या | प्रशिक्षणोत्तर नोकरी प्राप्त झालेल्या प्रशिक्षणार्थ्यांची संख्या | बेरोजगार असलेल्या प्रशिक्षणार्थ्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ७. | १९९२-९३ | १. किनवट,जि.नांदेड | १२८ | ९० | ३८ | ११ | ७९ |
| | | २. चंद्रपूर | १०९ | ९६ | १३ | ३३ | ६३ |
| | | ३. देवरी, जि.गोंदिया | १०० | १०० | - | ६ | ९४ |
| | | ४. अचलपूर, जि. अमरावती | १०६ | ८१ | २५ | ०७ | ७४ |
| | | **एकूण** | **४४३** | **३६७** | **७६** | **५७** | **३१०** |
| ८. | १९९३-९४ | १. किनवट,जि.नांदेड | १३३ | ८५ | ४८ | २० | ६५ |
| | | २. चंद्रपूर | ११२ | ९३ | १९ | २९ | ६४ |
| | | ३. देवरी, जि.गोंदिया | १०२ | १०२ | - | २ | १०० |
| | | ४. अचलपूर, जि. अमरावती | ९४ | ७६ | १८ | ४ | ७२ |
| | | **एकूण** | **४४१** | **३५६** | **८५** | **५५** | **३०१** |
| ९. | १९९४-९५ | १. किनवट,जि.नांदेड | ९९ | ५१ | ४८ | १२ | ३९ |
| | | २. चंद्रपूर | ११२ | ८८ | २४ | ३१ | ५७ |
| | | ३. देवरी, जि.गोंदिया | १०० | ९३ | ७ | - | ९३ |
| | | ४. अचलपूर, जि. अमरावती | ९५ | ६९ | २६ | २ | ६७ |
| | | ५. गडचिरोली | ४० | ४० | - | १२ | २८ |
| | | **एकूण** | **४४६** | **३४१** | **१०५** | **५७** | **२८४** |
| १०. | १९९५-९६ | १. किनवट,जि.नांदेड | ११० | ६४ | ४६ | १० | ५४ |
| | | २. चंद्रपूर | ११० | ८६ | २४ | २५ | ६१ |
| | | ३. देवरी, जि.गोंदिया | १०१ | ९६ | ५ | १ | ९५ |
| | | ४. अचलपूर, जि. अमरावती | ९२ | ६४ | २८ | १ | ६३ |
| | | ५. गडचिरोली | १०१ | ८२ | १९ | २७ | ५५ |
| | | **एकूण** | **५१४** | **३९२** | **१२२** | **६४** | **३२८** |
| ११. | १९९६-९७ | १. किनवट,जि.नांदेड | ११८ | ६८ | ५० | ४ | ६४ |
| | | २. चंद्रपूर | १०२ | ७५ | २७ | ११ | ६४ |
| | | ३. देवरी, जि.गोंदिया | ८७ | ८१ | ६ | ४ | ७७ |
| | | ४. अचलपूर, जि. अमरावती | ९३ | ६५ | २८ | ३ | ६२ |
| | | ५. गडचिरोली | १०६ | १०६ | - | १४ | ९२ |
| | | **एकूण** | **५०६** | **३९५** | **१११** | **३६** | **३५९** |
| १२. | १९९७-९८ | १. किनवट,जि.नांदेड | १०२ | ७० | ३२ | २ | ६८ |
| | | २. चंद्रपूर | १०८ | ७१ | ३७ | १० | ६१ |
| | | ३. देवरी, जि.गोंदिया | ९८ | ८९ | ९ | २ | ८७ |
| | | ४. अचलपूर, जि. अमरावती | ७४ | ४८ | २६ | १ | ४७ |
| | | ५. गडचिरोली | १०७ | १०७ | - | ३० | ७७ |
| | | **एकूण** | **४८९** | **३८५** | **१०४** | **४५** | **३४०** |

| अ. क्र. | वर्ष | केंद्राचे नांव | प्रवेशित प्रशिक्षणार्थींची एकूण संख्या | प्रशिक्षण पूर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थींची संख्या | अर्धवट प्रशिक्षण सोडून गेलेल्या प्रशिक्षणार्थ्यांची संख्या | प्रशिक्षणोत्तर नोकरी प्राप्त झालेल्या प्रशिक्षणार्थ्यांची संख्या | बेरोजगार असलेल्या प्रशिक्षणार्थ्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १३. | १९९८-९९ | १. किनवट,जि.नांदेड | ११२ | ४६ | ६६ | १ | ४५ |
| | | २. चंद्रपूर | ८७ | ५९ | २८ | १२ | ४७ |
| | | ३. देवरी, जि.गोंदिया | ९६ | ८४ | १२ | १४ | ७० |
| | | ४. अचलपूर, जि. अमरावती | ६३ | ४५ | १८ | १ | ४४ |
| | | ५. गडचिरोली | ७४ | ७४ | - | १७ | ५७ |
| | | **एकूण** | **४३२** | **३०८** | **१२४** | **४५** | **२६३** |
| १४. | ९९-२००० | १. किनवट,जि.नांदेड | ८९ | ५६ | ३३ | ४ | ५२ |
| | | २. चंद्रपूर | ८५ | ६२ | २३ | ११ | ५१ |
| | | ३. देवरी, जि.गोंदिया | १०१ | ९० | ११ | १ | ८९ |
| | | ४. अचलपूर, जि. अमरावती | ७७ | ४३ | ३४ | - | ४३ |
| | | ५. गडचिरोली | ८५ | ८५ | - | २० | ६५ |
| | | **एकूण** | **४३७** | **३३६** | **१०१** | **३६** | **३००** |
| १५. | २०००-०१ | १. किनवट,जि.नांदेड | ८० | ३० | ५० | ० | ३० |
| | | २. चंद्रपूर | १०६ | ७७ | २९ | ७ | ७० |
| | | ३. देवरी, जि.गोंदिया | ९३ | ७७ | १६ | १ | ७६ |
| | | ४. अचलपूर, जि. अमरावती | ८१ | ४३ | ३८ | २ | ४१ |
| | | ५. गडचिरोली | ९५ | ६० | ३५ | २० | ४० |
| | | **एकूण** | **४५५** | **२८७** | **१६८** | **३०** | **२५७** |
| १६. | ०१-०२ | १. किनवट,जि.नांदेड | ७८ | ४८ | ३० | २ | ४६ |
| | | २. चंद्रपूर | ९४ | ७९ | १५ | ११ | ६८ |
| | | ३. देवरी, जि.गोंदिया | १०२ | ८१ | २१ | १ | ८० |
| | | ४. अचलपूर, जि. अमरावती | ८४ | ४६ | ३८ | १ | ४५ |
| | | ५. गडचिरोली | ९५ | ८४ | ११ | २ | ८२ |
| | | **एकूण** | **४५३** | **३३८** | **११५** | **१७** | **३२१** |
| १७. | ०२-०३ | १. किनवट,जि.नांदेड | ९१ | ४३ | ४८ | १ | ४२ |
| | | २. चंद्रपूर | ७९ | ६० | १९ | १२ | ४८ |
| | | ३. देवरी, जि.गोंदिया | ९१ | ७५ | १६ | - | ७५ |
| | | ४. अचलपूर, जि. अमरावती | ७२ | ४७ | २५ | - | ४७ |
| | | ५. गडचिरोली | १०१ | ८५ | १६ | - | ८५ |
| | | **एकूण** | **४३४** | **३१०** | **१२४** | **१३** | **२९७** |
| १८. | ०३-०४ | १. किनवट,जि.नांदेड | ६४ | ३१ | ३३ | ० | ३१ |
| | | २. चंद्रपूर | ७१ | ५५ | १६ | १२ | ४३ |
| | | ३. देवरी, जि.गोंदिया | ९५ | ७२ | २३ | २ | ७० |
| | | ४. अचलपूर, जि. अमरावती | ८१ | ५४ | २७ | - | ५४ |
| | | ५. गडचिरोली | ११२ | ८६ | २६ | ६७ | १९ |
| | | **एकूण** | **४२३** | **२९८** | **१२५** | **८१** | **२१७** |
| | | **एकूण सर्व** | **७४५१** | **५७२३** | **१७२८** | **१०१५** | **४७०८** |

सन १९८६-८७ ते २००३-२००४ या कालावधीमध्ये रोजगार व स्वयं रोजगार मार्गदर्शन केंद्र, किनवट, जिल्हा नांदेड येथील केंद्रात एकूण १६७३ उमेदवारांना प्रशिक्षणासाठी प्रवेश दिला होता. त्यापैकी ६७८ (म्हणजे ४०%) प्रशिक्षणार्थ्यांनी अर्ध्यावरच प्रशिक्षण सोडून दिले. उर्वरित ९९५ प्रशिक्षणार्थ्यांनी प्रशिक्षण पूर्ण केले, त्यापैकी १४५ आदिवासी प्रशिक्षणार्थ्यांना नोकरी प्राप्त झाली आहे.

केंद्र निहाय माहिती दर्शविणारा तक्ता खालील प्रमाणे आहे.

**ज्या प्रशिक्षणार्थ्यांनी रोजगार, स्वयंरोजगार व मार्गदर्शन केंद्रामार्फत प्रशिक्षण घेतले आहे अशा प्रशिक्षणार्थ्यांची, योजना सुरुवातीपासूनची माहिती दर्शविणारा तक्ता.**

| अ. क्र. | वर्ष | केंद्राचे नांव | प्रवेशित प्रशिक्षणा-र्थींची संख्या | प्रशिक्षण पूर्ण केलेल्या प्रशिक्षणा-र्थींची संख्या | अर्धवट प्रशिक्षण सोडून गेलेल्या प्रशिक्षणा-र्थ्यांची संख्या | प्रशिक्षणोत्तर नोकरी प्राप्त झालेल्या प्रशिक्षणा-र्थ्यांची संख्या | बेरोजगार प्रशिक्षणा-र्थ्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १९८६-८७ | किनवट, जिल्हा नांदेड | ७२ | ५५ | १७ | - | ५५ |
| | १९८७-८८ | | ५८ | ३९ | १९ | २४ | १५ |
| | १९८८-८९ | | ७४ | ४७ | २७ | २० | २७ |
| | १९८९-९० | | ७८ | ४४ | ३४ | १९ | २५ |
| | १९९०-९१ | | ८७ | ५३ | ३४ | १० | ४३ |
| | १९९१-९२ | | १०० | ७५ | २५ | ५ | ७० |
| | १९९२-९३ | | १२८ | ९० | ३८ | ११ | ७९ |
| | १९९३-९४ | | १३३ | ८५ | ४८ | २० | ६५ |
| | १९९४-९५ | | ९९ | ५१ | ४८ | १२ | ३९ |
| | १९९५-९६ | | ११० | ६४ | ४६ | १० | ५४ |
| | १९९६-९७ | | ११८ | ६८ | ५० | ४ | ६४ |
| | १९९७-९८ | | १०२ | ७० | ३२ | २ | ६८ |
| | १९९८-९९ | | ११२ | ४६ | ६६ | १ | ४५ |
| | ९९-२००० | | ८९ | ५६ | ३३ | ४ | ५२ |
| | २०००-०१ | | ८० | ३० | ५० | ० | ३० |
| | २००१-०२ | | ७८ | ४८ | ३० | २ | ४६ |
| | २००२-०३ | | ९१ | ४३ | ४८ | १ | ४२ |
| | २००३-०४ | | ६४ | ३१ | ३३ | ० | ३१ |
| | | **एकूण** | **१६७३** | **९९५** | **६७८** | **१४५** | **८५०** |
| २. | १९८६-८७ | चंद्रपूर | ५३ | ४५ | ८ | ३६ | ९ |
| | १९८७-८८ | | ८५ | ७१ | १४ | ४९ | २२ |
| | १९८८-८९ | | ८५ | ७३ | १२ | ४२ | ३१ |
| | १९८९-९० | | ८७ | ५६ | ३१ | ४० | १६ |

| अ. क्र. | वर्ष | केंद्राचे नांव | प्रवेशित प्रशिक्षणार्थींची संख्या | प्रशिक्षण पूर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थींची संख्या | अर्धवट प्रशिक्षण सोडून गेलेल्या प्रशिक्षणार्थ्यांची संख्या | प्रशिक्षणोत्तर नोकरी प्राप्त झालेल्या प्रशिक्षणार्थ्यांची संख्या | बेरोजगार प्रशिक्षणार्थ्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | १९९०-९१ | | ९४ | ६२ | २ | २६ | ३६ |
| | १९९१-९२ | | १०७ | ८९ | १८ | २५ | ६४ |
| | १९९२-९३ | | १०९ | ९६ | १३ | ३३ | ६३ |
| | १९९३-९४ | | ११२ | ९३ | १९ | २९ | ६४ |
| | १९९४-९५ | | ११२ | ८८ | २४ | ३१ | ५७ |
| | १९९५-९६ | | ११० | ८६ | २४ | २५ | ६१ |
| | १९९६-९७ | | १०२ | ७५ | २७ | ११ | ६४ |
| | १९९७-९८ | | १०८ | ७१ | ३७ | १० | ६१ |
| | १९९८-९९ | | ८७ | ५९ | २८ | १२ | ४७ |
| | ९९-२००० | | ८५ | ६२ | २३ | ११ | ५१ |
| | २०००-०१ | | १०६ | ७७ | २९ | ७ | ७० |
| | २००१-०२ | | ९४ | ७९ | १५ | ११ | ६८ |
| | २००२-०३ | | ७९ | ६० | १९ | १२ | ४८ |
| | २००३-०४ | | ७१ | ५५ | १६ | १२ | ४३ |
| | | **एकूण** | **१६८६** | **१२९७** | **३८९** | **४२२** | **८७५** |
| ३. | १९८६-८७ | देवरी, जि.गोंदिया | ७८ | ७० | ८ | ५ | ६५ |
| | १९८७-८८ | | ८२ | ७७ | ५ | ५ | ७२ |
| | १९८८-८९ | | ८७ | ८६ | १ | ९ | ७७ |
| | १९८९-९० | | ८७ | ८७ | - | १९ | ६८ |
| | १९९०-९१ | | ८३ | ८२ | १ | १२ | ७० |
| | १९९१-९२ | | ९४ | ८५ | ९ | २ | ८३ |
| | १९९२-९३ | | १०० | १०० | - | ६ | ९४ |
| | १९९३-९४ | | १०२ | १०२ | - | २ | १०० |
| | १९९४-९५ | | १०० | ९३ | ७ | - | ९३ |
| | १९९५-९६ | | १०१ | ९६ | ५ | १ | ९५ |
| | १९९६-९७ | | ८७ | ८१ | ६ | ४ | ७७ |
| | १९९७-९८ | | ९८ | ८९ | ९ | २ | ८७ |
| | १९९८-९९ | | ९६ | ८४ | १२ | १४ | ७० |
| | ९९-२००० | | १०१ | ९० | ११ | १ | ८९ |
| | २०००-०१ | | ९३ | ७७ | १६ | १ | ७६ |
| | २००१-०२ | | १०२ | ८१ | २१ | १ | ८० |
| | २००२-०३ | | ९१ | ७५ | १६ | - | ७५ |
| | २००३-०४ | | ९५ | ७२ | २३ | २ | ७० |
| | | **एकूण** | **१६७७** | **१५२७** | **१५०** | **८६** | **१४४१** |

| अ. क्र. | वर्ष | केंद्राचे नांव | प्रवेशित प्रशिक्षणार्थींची संख्या | प्रशिक्षण पूर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थींची संख्या | अर्धवट प्रशिक्षण सोडून गेलेल्या प्रशिक्षणार्थ्यांची संख्या | प्रशिक्षणोत्तर नोकरी प्राप्त झालेल्या प्रशिक्षणार्थ्यांची संख्या | बेरोजगार प्रशिक्षणार्थ्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४. | १९८६-८७ | अचलपूर, जिल्हा अमरावती | ७८ | ७१ | ७ | ३७ | ३४ |
| | १९८७-८८ | | ७९ | ७७ | २ | २१ | ५६ |
| | १९८८-८९ | | ७७ | ७० | ७ | २४ | ४६ |
| | १९८९-९० | | ८४ | ६८ | १६ | २८ | ४० |
| | १९९०-९१ | | ७७ | ५४ | २३ | १३ | ४१ |
| | १९९१-९२ | | ९२ | ७४ | १८ | ८ | ६६ |
| | १९९२-९३ | | १०६ | ८१ | २५ | ०७ | ७४ |
| | १९९३-९४ | | ९४ | ७६ | १८ | ४ | ७२ |
| | १९९४-९५ | | ९५ | ६९ | २६ | २ | ६७ |
| | १९९५-९६ | | ९२ | ६४ | २८ | १ | ६३ |
| | १९९६-९७ | | ९३ | ६५ | २८ | ३ | ६२ |
| | १९९७-९८ | | ७४ | ४८ | २६ | १ | ४७ |
| | १९९८-९९ | | ६३ | ४५ | १८ | १ | ४४ |
| | ९९-२००० | | ७७ | ४३ | ३४ | - | ४३ |
| | २०००-०१ | | ८१ | ४३ | ३८ | २ | ४१ |
| | २००१-०२ | | ८४ | ४६ | ३८ | १ | ४५ |
| | २००२-०३ | | ७२ | ४७ | २५ | - | ४७ |
| | २००३-०४ | | ८१ | ५४ | २७ | - | ५४ |
| | | **एकूण** | **१४९९** | **१०९५** | **४०४** | **१५३** | **९४२** |
| ५. | १९९४-९५ | गडचिरोली | ४० | ४० | - | १२ | २८ |
| | १९९५-९६ | | १०१ | ८२ | १९ | २७ | ५५ |
| | १९९६-९७ | | १०६ | १०६ | - | १४ | ९२ |
| | १९९७-९८ | | १०७ | १०७ | - | ३० | ७७ |
| | १९९८-९९ | | ७४ | ७४ | - | १७ | ५७ |
| | ९९-२००० | | ८५ | ८५ | - | २० | ६५ |
| | २०००-०१ | | ९५ | ६० | ३५ | २० | ४० |
| | २००१-०२ | | ९५ | ८४ | ११ | २ | ८२ |
| | २००२-०३ | | १०१ | ८५ | १६ | - | ८५ |
| | २००३-०४ | | ११२ | ८६ | २६ | ६७ | १९ |
| | | **एकूण** | **९१६** | **८०९** | **१०७** | **२०९** | **६००** |

## पाच केंद्रांचा वर्षनिहाय एकत्रित गोषवाऱ्याचा तक्ता

| अ. क्र. | वर्ष | प्रवेशित प्रशिक्षणार्थींची संख्या | प्रशिक्षण पूर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थींची संख्या | अर्धवट प्रशिक्षण सोडून गेलेल्या प्रशिक्षणार्थींची संख्या | प्रशिक्षणोत्तर नोकरी प्राप्त झालेल्या प्रशिक्षणार्थींची संख्या | बेरोजगार प्रशिक्षणार्थ्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १९८६-८७ | २८१ | २४१ | ४० | ७८ | १६३ |
| २. | १९८७-८८ | ३०४ | २६४ | ४० | ९९ | १६५ |
| ३. | १९८८-८९ | ३२३ | २७६ | ४७ | ९५ | १८१ |
| ४. | १९८९-९० | ३३६ | २५५ | ८१ | १०६ | १४९ |
| ५. | १९९०-९१ | ३४१ | २५१ | ९० | ६१ | १९० |
| ६. | १९९१-९२ | ३९३ | ३२३ | ७० | ४० | २८३ |
| ७. | १९९२-९३ | ४४३ | ३६७ | ७६ | ५७ | ३१० |
| ८. | १९९३-९४ | ४४१ | ३५६ | ८५ | ५५ | ३०१ |
| ९. | १९९४-९५ | ४४६ | ३४१ | १०५ | ५७ | २८४ |
| १०. | १९९५-९६ | ५१४ | ३९२ | १२२ | ६४ | ३२८ |
| ११. | १९९६-९७ | ५०६ | ३९५ | १११ | ३६ | ३५९ |
| १२. | १९९७-९८ | ४८९ | ३८५ | १०४ | ४५ | ३४० |
| १३. | १९९८-९९ | ४३२ | ३०८ | १२४ | ४५ | २६३ |
| १४. | ९९-२००० | ४३७ | ३३६ | १०१ | ३६ | ३०० |
| १५. | २०००-०१ | ४५५ | २८७ | १६८ | ३० | २५७ |
| १६. | २००१-०२ | ४५३ | ३३८ | ११५ | १७ | ३२१ |
| १७. | २००२-०३ | ४३४ | ३१० | १२४ | १३ | २९७ |
| १८. | २००३-०४ | ४२३ | २९८ | १२५ | ८१ | २१७ |
| | **एकूण** | **७४५१** | **५७२३** | **१७२८** | **१०१५** | **४७०८** |

## पाच केंद्रांचा गोषवारा

| अ. क्र. | केंद्राचे नांव | प्रवेशित प्रशिक्षणार्थींची संख्या | प्रशिक्षण पूर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थींची संख्या | अर्धवट प्रशिक्षण सोडून गेलेल्या प्रशिक्षणा- र्थींची संख्या | प्रशिक्षणोत्तर नोकरी प्राप्त झालेल्या प्रशिक्षणा- र्थींची संख्या | बेरोजगार प्रशिक्षणा- र्थींची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | किनवट, जिल्हा नांदेड | १६७३ | ९९५ | ६७८ | १४५ | ८५० |
| २. | चंद्रपूर | १६८६ | १२९७ | ३८९ | ४२२ | ८७५ |
| ३. | देवरी, जिल्हा गोंदिया | १६७७ | १५२७ | १५० | ८६ | १४४१ |
| ४. | अचलपूर, जिल्हा अमरावती | १४९९ | १०९५ | ४०४ | १५३ | ९४२ |
| ५. | गडचिरोली | ९१६ | ८०९ | १०७ | २०९ | ६०० |
| | **एकूण** | **७४५१** | **५७२३** | **१७२८** | **१०१५** | **४७०८** |

**प्रशिक्षणानंतर उपलब्ध नोकरी** : पाच केंद्र स्थापनेपासून ५७२३ आदिवासी प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षित केले आहे. यापैकी फक्त १०१५ प्रशिक्षणार्थ्यांना नोकरी मिळाली आहे असे वरील सांख्यिकी माहितीचे पृथ्थक्करण केले असता दिसून येते.

केंद्राकडून पुरविलेल्या माहितीच्या आधारे ज्या प्रशिक्षणार्थ्यांना नोकरी मिळाली आहे अशा प्रशिक्षणार्थ्यांना भेटून माहिती घेण्याचा प्रयत्न केला आहे. ज्या २५ प्रशिक्षणार्थ्यांच्या भेटी होऊ शकल्या यांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | केंद्राचे नांव | जिल्हा | प्रशिक्षणार्थ्यांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | अचलपूर | अमरावती | ३ |
| २ | गडचिरोली | गडचिरोली | ११ |
| ३ | देवरी | गोंदिया | - |
| ४ | किनवट | नांदेड | ३ |
| ५ | चंद्रपूर | चंद्रपूर | ८ |
| | | **एकूण** | **२५** |

ज्या २५ प्रशिक्षणार्थ्यांना नोकरी मिळाली त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | केंद्राचे नांव | जिल्हा | अ. क्र. | कोणत्या पदावर कार्यरत आहेत |
|---|---|---|---|---|
| १ | अचलपूर | अमरावती | १ | अंगणवाडी सेविका |
| | | | २ | शिपाई |
| | | | ३ | तलाठी |
| २ | गडचिरोली | गडचिरोली | ४ | कनिष्ठ सहाय्यक |
| | | | ५ | कनिष्ठ लिपीक |
| | | | ६ | वरिष्ठ सहाय्यक |
| | | | ७ | कनिष्ठ लिपीक |
| | | | ८ | कनिष्ठ सहाय्यक |
| | | | ९ | वरिष्ठ लिपीक |
| | | | १० | कनिष्ठ लिपीक |
| | | | ११ | पोलीस शिपाई |
| | | | १२ | पोलीस शिपाई |
| | | | १३ | पोलीस शिपाई |
| | | | १४ | पोलीस शिपाई |
| ३ | किनवट | नांदेड | १५ | अंगणवाडी सेविका |
| | | | १६ | लिपीक |
| | | | १७ | कंत्राटी शिक्षक |
| ४. | चंद्रपूर | चंद्रपूर | १८ | कनिष्ठ लिपीक |
| | | | १९ | ग्रामसेवक |
| | | | २० | लिपीक |
| | | | २१ | लिपीक |
| | | | २२ | सेविका |
| | | | २३ | वरिष्ठ लिपीक |
| | | | २४ | कनिष्ठ लिपीक |
| | | | २५ | लिपीक |
| | | **एकूण** | **२५** | |

ज्या प्रशिक्षणार्थ्यांनी मध्येच प्रशिक्षण अर्धवट सोडून दिले अशा २६ प्रशिक्षणार्थ्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन प्रश्नावली क्र. २ भरुन घेण्यात आली असून त्यांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | केंद्राचे नांव | जिल्हा | प्रशिक्षणार्थ्यांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | अचलपूर | अमरावती | २ |
| २ | गडचिरोली | गडचिरोली | ४ |
| ३ | देवरी | गोंदिया | ५ |
| ४ | किनवट | नांदेड | १३ |
| ५ | चंद्रपूर | चंद्रपूर | २ |
| | | **एकूण** | **२६** |

प्रशिक्षणार्थ्यांनी मध्येच प्रशिक्षण अर्धवट सोडल्याबाबतची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | प्रशिक्षण अर्धवट सोडून जाण्याची कारणे | अचल पूर | गडचि-रोली | देवरी | किनवट | चंद्रपूर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | घरगुती अडचणीमुळे | १ | - | - | १ | - | २ |
| २. | आजारपणामुळे | १ | - | २ | २ | २ | ७ |
| ३. | केंद्राच्या ठिकाणी भोजन व निवासाची सुविधा नसल्याने | - | १ | २ | - | - | ३ |
| ४. | नोकरी मिळाल्यामुळे | - | १ | - | - | - | १ |
| ५. | महाविद्यालयीन परीक्षा असल्यामुळे | - | १ | - | - | - | १ |
| ६. | योग्य मार्गदर्शन मिळत नसल्याने | - | १ | - | - | - | १ |
| ७. | आर्थिक अडचणी आणि घरगुती काम | - | - | १ | ५ | - | ६ |
| ८. | केंद्र, घरापासून लांब अंतरावर असल्यामुळे | - | - | - | २ | - | २ |
| ९. | प्रशिक्षणाची व महाविद्यालयाची वेळ एकच येत असल्याने | - | - | - | १ | - | १ |
| १०. | दररोजची मजुरी बुडत असल्याने | - | - | - | १ | - | १ |
| ११. | कारण नमूद केले नाही | - | - | - | १ | - | १ |
| | **एकूण** | २ | ४ | ५ | १३ | २ | २६ |

सर्व्हेक्षण टीमने सर्व्हेक्षण करतेसमयी ज्या उमेदवारांनी प्रशिक्षण पूर्ण केले परंतु अद्यापी बेरोजगार आहेत अशा ६२ उमेदवारांच्या प्रत्यक्ष भेटी घेऊन प्रश्नावली क्रमांक २ मध्ये माहिती घेतली.

केंद्रनिहाय प्रशिक्षणार्थ्यांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| **अ.क्र.** | **केंद्राचे नांव** | **जिल्हा** | मुलाखत घेतलेल्या उमेदवारांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | अचलपूर | अमरावती | १६ |
| २ | गडचिरोली | गडचिरोली | १२ |
| ३ | देवरी | गोंदिया | १७ |
| ४ | किनवट | नांदेड | ६ |
| ५ | चंद्रपूर | चंद्रपूर | ११ |
| | | **एकूण** | **६२** |

प्रशिक्षणार्थ्यांची माहिती, गोळा करतेवेळी शैक्षणिक पात्रतेबाबत घेतलेली संक्षिप्त माहिती खालीलप्रमाणे आहे.

**प्रशिक्षण पूर्ततेच्या वेळी असलेली प्रशिक्षणार्थींची शैक्षणिक पात्रता**

| **अ. क्र.** | **केंद्राचे नांव** | **प्रशिक्षणार्थींची शैक्षणिक पात्रता** | | | | | | | | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **पदवीधर** | | | | | | **पदव्युत्तर** | | |
| | | एस एस सी | एच एस सी | डी.एड. | एफ. वाय | एस. वाय | टी. वाय् | भाग-१ | भाग-२ | |
| १. | अचलपूर, जिल्हा अमरावती | ५ | ६ | - | १ | ४ | - | - | - | १६ |
| २. | गडचिरोली | ३ | ४ | - | - | ४ | १ | - | - | १२ |
| ३. | देवरी, ज़िल्हा गोंदिया | २ | १० | - | १ | ३ | १ | - | - | १७ |
| ४. | किनवट, जिल्हा नांदेड | ३ | २ | - | - | - | - | १ | - | ६ |
| ५. | चंद्रपूर | - | २ | १ | १ | ४ | १ | २ | - | ११ |
| | **एकूण** | **१३** | **२४** | **१** | **३** | **१५** | **३** | **३** | **-** | **६२** |

सर्व्हेक्षणात असे दिसून येते की, आदिवासी उमेदवारांना विविध स्पर्धा परीक्षांची माहिती मिळत नाही. एकदा प्रशिक्षण पूर्ण झाले की, नंतर प्रशिक्षण केंद्रामार्फत आदिवासी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची माहिती दिली जात नाही आणि याबाबत पाठपुरावा केला जात नाही. सर्वेक्षणात असेही निदर्शनास आले आहे की, बऱ्याच प्रशिक्षणार्थ्यांच्या गावात दैनिक वर्तमानपत्र उपलब्ध होत नाही. प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण घेतल्यानंतरही प्रशिक्षणार्थ्यांना नोकरी मिळण्याच्या संधीची माहिती मिळत नसल्यामुळे नोकरी न मिळण्याचे एक कारण आहे.

## क) प्रशिक्षण घेत असलेल्या चालू प्रशिक्षण सत्रा संदर्भातील निरीक्षणे :

प्रशिक्षण सत्रामध्ये प्रशिक्षण घेत असलेल्या ४५ आदिवासी प्रशिक्षणार्थ्यांची प्रश्नावलीद्वारे माहिती घेण्यात आली. त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | केंद्राचे नांव | जिल्हा | प्रशिक्षणार्थींची संख्या |
|---|---|---|---|
| १ | अचलपूर | अमरावती | १६ |
| २ | गडचिरोली | गडचिरोली | ११ |
| ३ | देवरी | गोंदिया | १८ |
| ४ | किनवट | नांदेड | - |
| ५ | चंद्रपूर | चंद्रपूर | - |
| | | **एकूण** | **४५** |

प्रशिक्षणार्थी काय करु इच्छितात याची संक्षिप्त माहिती खालीलप्रमाणे देण्यात आली आहे.

## i) प्रशिक्षणानंतर प्रशिक्षणार्थी काय करु इच्छितात त्या माहितीचा तक्ता

(प्रश्नावली क्र.४ रकाना क्र.१२)

| अ. क्र. | केंद्राचे नांव | एकूण प्रशिक्ष-णार्थी | स्वयं रोजगार व्यापार/ मेकॅ-निक | बाल-वाडी सेविका / शिक्षिका | पोलीस/ सैनिक | वन-संर क्षक | नर्स/ परि चारि का | ग्राम-सेवक/ लिपीक | पोलीस इन्स्प-ेक्टर | अधि कारी | चालक /वाहक | वायर मन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | अचलपूर | १६ | ५ | ३ | ५ | १ | १ | १ | - | - | - | - |
| २. | गर्डचिरोली | ११ | - | २ | २ | - | - | - | २ | ५ | - | - |
| ३. | देवरी | १८ | - | २ | ५ | १ | १ | ३ | - | २ | ३ | १ |
| ४. | किनवट | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ५. | चंद्रपूर | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| | **एकूण** | **४५** | **५** | **७** | **१२** | **२** | **२** | **४** | **२** | **७** | **३** | **१** |

## ii) निदर्शनास आलेल्या बाबी

१. एका प्रशिक्षण सत्रात, निरनिराळी ध्येय असलेल्या प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात येते.

२. बऱ्याच प्रशिक्षणार्थ्यांना त्यांचे ध्येय साध्य करण्यासाठी मार्गदर्शनाची गरज असते. जसे एखाद्या प्रशिक्षणार्थ्याला शिक्षक व्हावयाचे असेल तर त्याला अध्यापन पदवीका (डी.एड.) व अध्यापन पदवी संपादीत करण्याबाबतचे मार्गदर्शन करणे गरजेचे आहे.

३. काही प्रशिक्षणार्थी स्वत:चा व्यवसाय करु इच्छितात, त्यांना स्पर्धा परीक्षेचे प्रशिक्षण देण्याचा काही उपयोग होत नाही.

४. काही प्रशिक्षणार्थी पोलीस कर्मचारी होऊ इच्छितात अशा प्रशिक्षणार्थ्यांना, आदिवासी प्रशिक्षणार्थ्यांकरिता चालू असलेल्या पोलीस व सैन्य भरती प्रशिक्षण केंद्राची माहिती द्यावी आणि भरती करीता प्रवेश घेण्यासाठी मार्गदर्शन करावे.

### पोलीस व सैन्य भरती यांच्याकरीता असलेले भरतीपूर्वीचे प्रशिक्षण देणारी केंद्रे

| अ.क्र. | केंद्राचे नांव | जिल्हा |
|---|---|---|
| १. | घोडेगांव, ता.आंबेगांव | पुणे |
| २. | अकोले, ता.अकोले | अहमदनगर |
| ३. | नाशिक | नाशिक |
| ४. | नंदूरबार | नंदूरबार |
| ५. | धारणी | अमरावती |
| ६. | किनवट | नांदेड |
| ७. | गडचिरोली | गडचिरोली |
| ८. | देवरी | गोंदिया |
| ९. | जव्हार | ठाणे |

५. जे उमेदवार मेकॅनिक होऊ इच्छितात त्यांना आय.टी.आय., तंत्रनिकेतन, अभियांत्रिकी महाविद्यालये/संस्थांमध्ये प्रवेश घेणेबाबत मार्गदर्शन करण्यात यावे.

६. काही प्रशिक्षणार्थी परिवहन महामंडळामध्ये वाहक / वाहनचालक होऊ इच्छितात. त्यांना आदिवासी उमेदवारांसाठी चालविण्यात येत असलेल्या वाहक/ वाहनचालक प्रशिक्षण केंद्रांची माहिती देणे गरजेचे आहे.

| अ.क्र. | प्रशिक्षण केन्द्रांचे नांव |
|---|---|
| १. | रणदिवे मोटार ड्रायव्हिंग स्कूल, नाशिक |
| २. | रमेश मोटार ड्रायव्हिंग स्कूल,जळगाव |

७. काही प्रशिक्षणार्थी परिचारिका होऊ इच्छित असतील तर अशा प्रशिक्षणार्थ्यांना परिचारीकाचे प्रशिक्षण घेणेबाबत मार्गदर्शन करण्यात यावे.

८. काही प्रशिक्षणार्थी लष्करी सेवेमध्ये जाऊ इच्छित असतील, तर अशांना आदिवासी उमेदवारांसाठी असलेल्या पोलीस/लष्कर सेवा भरती मार्गदर्शन केंद्रात प्रवेश घेणेबाबत मार्गदर्शन करण्यात यावे.

९. काही प्रशिक्षणार्थीचे ध्येय वायरमन बनण्याचे असेल, अशा प्रशिक्षणार्थ्यांना व्यवसाय शिक्षणाची पात्रता मिळविणेबाबत मार्गदर्शन करावे.

### iii) प्रशिक्षण केंद्रामधील गैरहजेरी

सर्वेक्षणाच्या वेळी सर्वेक्षण गटाने प्रशिक्षण केंद्रास दिलेल्या प्रत्यक्ष भेटींच्या वेळी केंद्रामध्ये ५०% पेक्षा अधिक प्रशिक्षणार्थी गैरहजर असल्याचे आढळून आले. त्याबाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे.

**प्रशिक्षणार्थीच्या प्रवेश व हजेरीची माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | केंद्राचे नांव | प्रवेश संख्या | | | प्रत्यक्ष हजेरी | | | प्रशिक्षणाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मुले | मुली | एकूण | मुले | मुली | एकूण | |
| १. | देवरी | २८ | ५ | ३३ | १४ | ४ | १८ | १.१२.०४ ते १५.३.०५ |
| २. | गडचिरोली | २३ | ३ | २६ | ८ | ३ | ११ | १.१२.०४ ते १५.३.०५ |
| ३. | अचलपूर | २३ | ५ | २८ | ११ | ५ | १६ | १.१२.०४ ते १५.३.०५ |
| | **एकूण** | **७४** | **१३** | **८७** | **३३** | **१२** | **४५** | |

### iv) प्रशिक्षणाची पध्दती :

१. प्रशिक्षणासाठी व्याख्यान पध्दतीचा अवलंब केला जात असल्याचे निदर्शनास आले.

२. रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन संचालनालयामार्फत घेण्यात येत असलेल्या प्रशिक्षणाच्या वेळापत्रकाची माहिती, संचालनालयाकडून खालीलप्रमाणे कळविण्यात आली आहे.

| वेळ | विषय |
|---|---|
| ८ ते ९ | गणित |
| ९ ते १० | इंग्रजी |
| १० ते ११ | बुध्दीमापन चाचणी |
| ११ ते १२.३० | विश्रांती |
| १२.३० ते १३.३० | सामान्य ज्ञान |
| १३.३० ते १४.३० | संगणक प्रशिक्षण |

३. असे कळविण्यात आले आहे की, विषयाचे तज्ञ/प्रशिक्षक यांना प्रतितास रु.४०/- इतक्या मानधनावर नियुक्त करण्यात येते. तथापि, प्रतितास रु.४०/- इतक्या मानधनावर प्रशिक्षक मिळत नाहीत. त्यामुळे आदिवासी प्रशिक्षणार्थी हे चांगल्या प्रशिक्षकाच्या प्रशिक्षणापासून वंचित राहतात.

४. रोजगार व स्वयंरोजगार संचालनालयामार्फत असे सांगण्यात आले आहे की, रु.४०/- प्रतितास हे मानधन अतिथी प्रशिक्षकांसाठी अत्यंत अल्प आहे. इतक्या कमी मानधनावर विषयानुरुप तज्ञ व्याख्याते प्रशिक्षणासाठी उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे तज्ञ प्रशिक्षकांच्या अभावी आदिवासी युवक योग्य प्रशिक्षणापासून वंचित राहतात हे येथे विशेषत्वाने नमूद करण्यात येत आहे. आणि असे असेल तर ज्या हेतूसाठी ही प्रशिक्षण केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत, तो हेतूच साध्य होत नाही. प्रशिक्षण केंद्रांमधून प्रशिक्षण पूर्ण केलेल्या युवकांच्या वरील तक्त्यात दिलेल्या आकडेवारीचे अवलोकन केले असता हे लक्षात येते की, प्रशिक्षीत प्रशिक्षणार्थ्यांना नोकरी मिळण्याबाबतचे साध्य अपेक्षेपेक्षा फारच कमी आहे. प्रशिक्षणार्थी प्रशिक्षण मध्येच अर्धवट सोडून जाण्याचे हे एक कारण आहे.

५. असे निदर्शनास येते की, वेगवेगळी उद्दिष्टे असलेल्या विविध प्रशिक्षणार्थ्यांची निवड करुन प्रशिक्षण देण्यात येत असल्याचे दिसून आले. प्रशिक्षण घेत असलेल्या ४५ प्रशिक्षणार्थींच्या नमुना पाहणीत असे दिसून आले की ४५ प्रशिक्षणार्थ्यामध्ये ५ प्रशिक्षणार्थींना मेकॅनिक म्हणून स्वत:चा व्यवसाय सुरु करण्याची इच्छा आहे, ७ प्रशिक्षणार्थी शिक्षक बनू इच्छितात. १२ प्रशिक्षणार्थी पोलीस/सैन्य दलात भरती होऊ इच्छितात. २ प्रशिक्षणार्थींना वन विभागात काम करण्याची इच्छा आहे. २ प्रशिक्षणार्थींनी परिचारक होण्याबाबत इच्छा प्रकट केली आहे. ४ प्रशिक्षणार्थींनी ग्रामसेवक/लिपीक होण्याची इच्छा दर्शविली आहे. २ प्रशिक्षणार्थ्यांनी पोलीस निरीक्षक, ७ प्रशिक्षणार्थ्यांनी अधिकारी तर ३ प्रशिक्षणार्थींनी वाहक/चालक बनण्याची इच्छा दर्शविली आहे. यावरुन असेही दिसून येते की, प्रशिक्षणार्थ्यांना जीवनाचा मार्ग निवडण्यासाठी योग्य मार्गदर्शन दिले जात नाही; जे की, मेकॅनिक, शिक्षक, परिचारिका इत्यादी पदाकरीता असलेली आवश्यक शैक्षणिक पात्रता प्रशिक्षणार्थी मिळवतील.

तसेच पोलीस/लष्कर क्षेत्रात निवड होण्यासाठी आदिवासी उमेदवारांना त्यांच्या निवडीप्रमाणे भरतीपूर्वी प्रशिक्षण देणारे ९ पोलीस प्रशिक्षण केंद्रे कार्यरत आहेत. तसेच नाशिक आणि जळगांव येथे केवळ आदिवासींकरीता वाहनचालकाचे शिक्षण देणारे प्रशिक्षण केंद्र आहे.

## ड) प्रशिक्षण केंद्रांमध्ये असलेल्या सोयी सुविधा

### (अ) इमारत :

आदिवासी युवकांसाठी गडचिरोली व चंद्रपूर येथे चालविले जाणारे रोजगार व स्वयं रोजगार मार्गदर्शन केंद्रे शासकीय इमारतींमध्ये कार्यरत आहेत, तर किनवट, देवरी आणि अचलपूर येथील केंद्रे खाजगी इमारतीमध्ये कार्यरत आहेत. या इमारतींबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

**रोजगार व स्वयं रोजगार मार्गदर्शन केंद्रांच्या इमारतींचा तपशील दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | केंद्राचे नांव | इमारत शासकीय / खाजगी | जागेचा तपशील | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | एकूण जागा (चौ.फूट) | मासिक भाडे (रुपये) | ताबा घेतल्याचा दिनांक |
| १. | किनवट | खाजगी | ११९७ | ४९०५ | ३०-९-१९८५ |
| २. | चंद्रपूर | शासकीय | १४०० | - | १-८-१९८६ |
| ३. | देवरी | खाजगी | २००४ | ३१७० | २१-१-१९८६ |
| ४. | गडचिरोली | शासकीय | ८०० | - | २-२-१९९४ |
| ५. | अचलपूर | खाजगी | १५८८ | ३६१० | १३-३-१९८६ |

असे निदर्शनास येते की, चंद्रपूर येथील प्रशिक्षण केंद्राची जागा पुरेशी असून बैठक व्यवस्थाही समाधानकारक आहे. तथापि, इतर केंद्रामध्ये (उदा. गडचिरोली, देवरी, अचलपूर व किनवट) पुरेशी जागा नाही. तसेच फर्निचर देखिल पुरेसे नसल्याचे पुढील तक्त्यावरुन दिसून येते.

## केंद्रामध्ये उपलब्ध असलेली फर्निचर सुविधा दर्शविणारा तक्ता

| अ. क्र. | केंद्राचे नांव | प्रशिक्षण हॉलची एकूण जागा (चौ.फूट) | आसन क्षमता | प्रत्यक्ष आसन व्यवस्था | उपलब्ध फर्निचरची माहिती | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | टेबल | खुर्च्या | बेंच | फळा |
| १. | किनवट, जिल्हा नांदेड | २५० | ४० | ४० | १ | १६ | १५ | १ |
| २. | अचलपूर, जिल्हा अमरावती | २५० | ४५ | ४५ | १ | २ | १५ | १ |
| ३. | देवरी, जिल्हा गोंदिया | ३०० | ४० | ४० | १ | ४० | ३ | १ |
| ४. | चंद्रपूर | ७०० | ४० | ४० | १३ | ३५ | २ | १ |
| ५. | गडचिरोली | २०० | ३५ | ३५ | ४ | २३ | २० | १ |

**(ब) ग्रंथालय :**

असे प्रकर्षाने निदर्शनास आले की, ग्रंथालयात सुविधा उपलब्धतेकडे पुरेसे लक्ष पुरविण्यात आलेले नाही. ग्रंथालयामध्ये संदर्भ पुस्तके पुरेशी नाहीत, मासिके यांची खरेदी करण्यात येत नाही. स्पर्धा परीक्षांसाठी आवश्यक असणारी मासिके प्रशिक्षणार्थीना पुरविण्यात येत नाहीत. दैनिक वर्तमानपत्रेही पुरेशी नसतात. तसेच ग्रंथालयामध्ये जी काही पुस्तके/मासिके उपलब्ध आहेत, ती देखिल प्रशिक्षणार्थींना त्यांच्या सोयीनुसार उपयोग करण्याकरीता पुरविण्यात येत नसल्याचे दिसून आले. ग्रंथालयामध्ये पुरेशी बैठक व्यवस्था (उदा. खुर्च्या/टेबले) नसल्याने प्रशिक्षणार्थीना त्या ठिकाणी बसून संदर्भ पुस्तकांचे वाचन करता येऊ शकत नाही. या बाबतीत असे सांगण्यात आले की, निधी पुरेसा उपलब्ध होत नाही म्हणून सोयी पुरवता येत नाहीत. परंतु खाली देण्यात आलेल्या खर्चाच्या तक्त्याचे अवलोकन केले असता 'ग्रंथालय' या बाबीवर कमीत कमी खर्च करण्यात आला असल्याचे दिसून येते.

## सन २००३-२००४ या वर्षासाठी अंदाजपत्रकीय तरतूद दर्शविणारा तक्ता

(रुपये लाखात)

| अ. क्र. | केंद्राचे नांव | अंदाज-पत्रकीय तरतूद | वेतनभत्ते, कर व इतर खर्च | मानधन | विद्यावेतन | पुस्तके व इतर शैक्षणिक साहित्य | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | देवरी | ७.६६ | ६.४५ | ०.३१ | ०.८७ | ०.०३ | ७.६६ |
| २. | अचलपूर | १०.२२ | ५.१५ | ०.५६ | ०.७० | ०.०२ | ६.४३ |
| ३. | गर्डचिरोली | ७.६० | ५.८२ | ०.२९ | १.११ | ०.०१ | ७.२३ |
| ४. | चंद्रपूर | ७.३४ | ६.७२ | ०.३३ | ०.७१ | ०.०६ | ७.८२ |
| ५. | किनवट | - | - | ०.३४ | ०.४८ | ०.०२ | - |
| | **एकूण** | **३२.८२** | **२४.१४** | **१.८३** | **३.८७** | **०.१४** | **२९.१४** |

किनवट येथील प्रशिक्षण केंद्राकडून अर्थसंकल्पीय तरतूद व वेतन भत्ते यावरील खर्च यांची माहिती दिलेली नाही.

गर्डचिरोली येथील प्रशिक्षण केंद्रामध्ये सन २००३-२००४ या वर्षात पुस्तके व इतर साहित्यावर रु. ६३६/- इतका खर्च करण्यात आला आहे. अचलपूरमध्ये रु. २४२९/-, देवरीमध्ये रु. ३०००/-, चंद्रपूरमध्ये रु. ५६६१/- तर किनवटमध्ये रु.२०९०/- इतका खर्च पुस्तके व इतर प्रशिक्षण साहित्यावर करण्यात आलेला आहे. याबाबतचे विस्तृत विवरण खालील तक्त्यात देण्यात आले आहे.

| अ.क्र. | केंद्राचे नांव | सन २००३-०४ या वर्षात शैक्षणिक साहित्यावर करण्यात आलेल्या खर्चाचा तपशील रुपये | साहित्य खरेदीचा तपशील |
|---|---|---|---|
| १. | देवरी | ३,०००.०० | - |
| २. | अचलपूर | २,४२९.०० | - |
| ३. | गर्डचिरोली | ६३६.०० | पुस्तके |
| ४. | चंद्रपूर | ५,६६१.०० | - |
| ५. | किनवट | २,०९०.०० | - |
| | **एकूण** | **१३,८१६.००** | |

वरील तक्त्यांचे पृथक्करण केले असता सन २००३-०४ या वर्षात शासनाने मंजूर केलेल्या रु.३२.८२ (लाख) तरतुदीपैकी रु. २९.१४ लाख खर्च करण्यात आला आहे. मात्र या खर्च झालेल्या रकमेपैकी केवळ रु. १३,८१६/- इतकी रक्कम शैक्षणिक साहित्य खरेदीवर खर्च करण्यात आला आहे. ही रक्कम एकूण खर्चाच्या केवळ ०.३६% इतकीच आहे.

### (क) इतर आवश्यक सुविधा :

सर्वात वाईट गोष्ट ही आहे की, गडचिरोली केंद्रामध्ये स्वच्छतागृहाची व्यवस्था नाही. देवरी येथील केंद्रात केवळ एकच स्वच्छतागृह आहे. प्रशिक्षणार्थीसाठी असलेल्या स्वच्छतागृहांच्या सुविधात सुधारणा करणे गरजेचे आहे. याबाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | केंद्राचे नांव | स्वच्छतागृहाची उपलब्धता | |
|---|---|---|---|
| | | बाथरुम | संडास |
| १. | किनवट | १ | २ |
| २. | अचलपूर | १ | २ |
| ३. | देवरी | १ | १ |
| ४. | चंद्रपूर | ३ | २ |
| ५. | गडचिरोली | - | - |

तथापि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, तसेच पंखे या सुविधा सर्व केंद्रांमधून पुरविण्यात आलेल्या आहेत. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे:

| अ.क्र. | केंद्राचे नांव | पिण्याच्या पाण्याची सुविधा | पंखे | कुलर्स |
|---|---|---|---|---|
| १. | किनवट | बोअर | १ | वॉटर कूलर |
| २. | अचलपूर | नळ | १ | वॉटर कूलर |
| ३. | देवरी | बोअर | १ | वॉटर कूलर/पिंप |
| ४. | चंद्रपूर | नळ | १ | वॉटर कूलर/स्टील पिंप |
| ५. | गडचिरोली | नळ | १ | वॉटर कूलर/स्टीलचे मोठे पिंप |

(ड) **करमणूक साहित्य :**

गडचिरोली येथील प्रशिक्षण केंद्रात एक दूरचित्रवाणी संच व एक रेडिओ आहे. प्रशिक्षणार्थ्यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय घडामोडींची माहिती होण्यासाठी ही दूरचित्रवाणीची सुविधा असणे गरजेचे आहे. चालू घडामोडींबाबत प्रशिक्षणार्थ्यांचे ज्ञान अद्ययावत राहण्यासाठी टीव्ही वर उपलब्ध असलेल्या चॅनेलची माहिती प्रशिक्षणार्थ्यांना देणे आवश्यक आहे. कोणत्याही प्रशिक्षण केंद्रात बंदिस्त व मैदानी खेळाची सुविधा उपलब्ध नाही. प्रशिक्षणार्थ्यांना शारिरीक दृष्टया योग्य करण्यासाठी बंदिस्त व मैदानी खेळांचा उपयोग होईल. या सोयीबाबतची संक्षिप्त माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | केंद्राचे नांव | करमणुक सुविधा | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | टी.व्ही. | रेडियो | बैठे/मैदानी खेळ | सहली |
| १. | किनवट | - | - | - | - |
| २. | अचलपूर | - | - | - | - |
| ३. | देवरी | - | - | - | - |
| ४. | चंद्रपूर | - | - | - | - |
| ५. | गडचिरोली | १ | १ | - | - |

(इ) **कर्मचारी वर्ग :**

असे निदर्शनास आले आहे की, किनवट येथील रोजगार व स्वयं रोजगार केंद्रात दिनांक २२-१-१९८५ ते ३-७-१९८९ या कालावधीमध्ये केंद्रप्रमुख म्हणून फक्त रोजगार व स्वयं रोजगार अधिकारी च कार्यरत होते. तसेच केंद्राच्या २० वर्षे कार्यकालावधीत फक्त ४ वर्षे ६ महिने कालावधीकरीता नियमित प्रमुख अधिकारी कार्यरत होते. उर्वरित कालावधीसाठी अतिरिक्त पदांचा कार्यभार जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार अधिकारी, नांदेड यांना देण्यात आला होता. नांदेड व किनवट या ठिकाणातील अंतर १५० कि.मी.आहे. कार्यक्षेत्राच्या ठिकाणापासून १५० कि.मी. दूर असलेल्या ठिकाणचा अतिरिक्त कार्यभर घेतलेल्या अधिकाऱ्यांचे काम कार्यक्षमतेने होणे अपेक्षीत नाही.

अशीच गोष्ट देवरी (जिल्हा गोंदिया) या ठिकाणच्या रोजगार व स्वयं रोजगार केंद्राची आहे. या केंद्राच्या १९ वर्षाच्या कार्यकाळातील ५ वर्षे ४ महिने इतक्या कमी कालावधीमध्ये नियमित प्रमुख अधिकारी हे केंद्रप्रमुख म्हणून कार्यरत होते. उर्वरित कालावधीत या पदाचा अतिरिक्त कार्यभार जिल्हा रोजगार व स्वयं रोजगार अधिकारी यांनीच सांभाळला आहे. अशीच बाब थोडयाफार फरकाने इतर केंद्रांच्या बाबतीतही आहे. सर्वच केंद्रामध्ये केंद्रप्रमुखाचा अतिरिक्त कार्यभार फार मोठया कालावधीसाठी इतर अधिकारी यांनी सांभाळलेला आहे. केंद्र प्रमुखांच्या अनुपस्थितीत केंद्राचे काम कार्यक्षमतेने चालेल अशी अपेक्षा करणे चुकीचे आहे. संबंधित विभागाने या बाबीकडे गांभीर्याने लक्ष

दिलेले नाही. वास्तविकतेकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे, याचा परिणाम असा झाला आहे की योजना पुरेशा कार्यक्षमतेने राबविली जात नसल्यामुळे योजनेचे उद्देश साध्य होऊ शकले नाही. प्रशिक्षण केंद्र प्रमुखांच्या कालावधीबाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे.

**रोजगार व स्वयं रोजगार केंद्रांमधील केंद्र प्रमुखांचा नियमित कार्यभार आणि रोजगार व स्वयंरोजगार अधिकारी यांनी घेतलेल्या अतिरिक्त कार्यभाराची माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ. क्र. | केंद्राचे नांव | पद-निर्मितीचा दिनांक | नियमित कार्यभाराचा कालावधी | अतिरिक्त कार्यभाराचा कालावधी | एकूण कालावधी | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | नियमित | अतिरिक्त |
| १. | अचलपूर, जिल्हा अमरावती | १९८६ | ७.१.८६ ते ३१.३.९३ | १.४.९३ ते २.७.९६ | ११ वर्ष ३ महिने | ७ वर्ष २ महिने |
| | | | ३.७.९६ ते ३१.१०.९७ | १.११.९७ ते ९.८.९९ | | |
| | | | १०.८.९९ ते १३.९.९९ | १४.९.९९ ते २.१२.९९ | | |
| | | | ३.१२.९९ ते ११.६.२००० | १२.६.२००० ते २०.७.२००० | | |
| | | | २१.७.२००० ते ३१.१०.२००० | १.११.२००० ते ३०.६.२००३ | | |
| | | | १.७.२००३ ते मार्च ,२००५ | | | |
| २. | गडचिरोली | १९९४ | १४.२.९४ ते ३०.६.९८ | २.२.९४ ते १३.२.९४ | ७ वर्ष ३ महिने | ३ वर्ष १० महिने |
| | | | १.७.९८ ते १४.६.२००० | १५.६.२००० ते ३०.६.२००३ | | |
| | | | १.७.२००३ ते १७.६.२००४ | १८.६.२००४ ते मार्च, २००५ | | |
| ३. | देवरी, जिल्हा गोंदिया | १९८६ | २१.१.८६ ते ३१.१०.९१ | १.११.९१ ते ५.७.९८ | १० वर्ष ९ महिने | ८ वर्ष ५ महिने |
| | | | ६.७.९८ ते २३.७.२००३ | २४.७.२००३ ते मार्च, २००५ | | |

| अ. क्र. | केंद्राचे नांव | पद-निर्मितीचा दिनांक | नियमित कार्यभाराचा कालावधी | अतिरिक्त कार्यभाराचा कालावधी | एकूण कालावधी | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | नियमित | अतिरिक्त |
| ४. | किनवट, जिल्हा नांदेड | १९८५ | २२.२.८६ ते ३.७.८९ | ४.७.८९ ते मार्च, २००५ | ३ वर्ष ५ महिने | १५ वर्ष ८ महिने |
| ५. | चंद्रपूर | १९८६ | ३०.५.८६ ते २८.३.९३ | २९.३.९३ ते १५.७.९९ | १२ वर्ष ७ महिने | ६ वर्ष ६ महिने |
| | | | १६.७.९९ ते ३१.१२.२००४ | ११.१.२००५ ते मार्च, २००५ | | |

केंद्रप्रमुखाप्रमाणेच इतर कर्मचारी वर्गाची स्थिती दर्शविणारी माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पदनाम | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १. | रोजगार व स्वयं रोजगार अधिकारी (वर्ग-२) | ५ | १ | ४ |
| २. | कनिष्ठ रोजगार व स्वयं रोजगार अधिकारी (वर्ग-३) | ५ | ४ | १ |
| ३. | लघुलेखक (प्रशिक्षक) | १ | - | १ |
| ४. | लिपीक तथा टंकलेखक | १० | ८ | २ |
| ५. | शिपाई | ५ | ५ | - |
| | एकूण | **२६** | **१८** | **८** |

***

# प्रकरण क्र. ५

# शिफारशी

१) विभागाच्या अधिकाऱ्यांनी विविध स्पर्धा परिक्षांची माहिती देण्यासाठी सहभागी होणे आवश्यक आहे. स्पर्धा परिक्षेबाबतची माहिती विविध मार्गांनी गोळा करुन घ्यावी आणि ही माहिती ग्रामपंचायत कार्यालयास उपलब्ध करुन द्यावी. आदिवासी क्षेत्रातील जिल्हाधिकारी कार्यालये, जिल्हा परिषद कार्यालये, पंचायत समिती कार्यालये, ग्रामपंचायत कार्यालये आणि इतर सर्व कार्यालयास प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत माहिती पाठवावी आणि ही माहिती या कार्यालयांच्या नोटीस बोर्डावर लावून मोठया प्रमाणात प्रसिध्दी द्यावी.

२) केंद्र प्रमुखांनी दरमहा ठराविक तारखेस आदिवासी प्रशिक्षणार्थ्यांसाठी विविध स्पर्धा परिक्षांची माहिती देण्याकरीता कार्यशाळा घेण्यात यावी आणि या कार्यशाळेत आदिवासी उमेदवारांना स्पर्धा परीक्षा संदर्भात अर्ज कसा भरावा, परीक्षेची तयारी कशी करावी, कोणत्या पध्दतीने अभ्यास करावा याबाबत मार्गदर्शन करावे.

३) ज्या आदिवासी उमेदवारांना विविध स्पर्धा परीक्षा द्यावयाच्या आहेत अशा उमेदवारांकडून अर्ज मागवून घ्यावा आणि त्याची ठराविक स्पर्धा परिक्षेकरिता प्राथमिक चाचणी परिक्षा घ्यावी म्हणजे प्रशिक्षणार्थींचा गट सारख्याच प्रकारचा राहील.

४) प्रशिक्षणासाठी सर्व सोईसुविधांनी युक्त असा हॉल असावा व त्यामध्ये दृकश्राव्य यंत्रणा बसवावी.

५) कमीत कमी ३० विद्यार्थी बसू शकतील अशी अद्ययावत ग्रंथालयाची सुविधा असावी, यात, संदर्भ पुस्तके सकाळपासून रात्रीपर्यंत उपलब्ध होतील अशी व्यवस्था करावी ; विविध स्पर्धा पुस्तकांची मोठया प्रमाणात उपलब्धता असावी. विविध स्पर्धा परिक्षेची तयारी करण्यासाठी बाजारपेठेत उपलब्ध असलेली उपयुक्त मासीके ग्रंथालयात मोठया प्रमाणात उपलब्ध करण्यात यावीत. राज्यस्तरावरील, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील बातम्या, तांत्रिक व वैज्ञानिक प्रगती, आर्थिक विवेचन इत्यादी बाबींची माहिती मिळणारे मराठी व इंग्रजी माध्यमाचे दैनिके पुरेसे उपलब्ध असावीत.

६) स्पर्धा परीक्षा प्रशिक्षणासाठी निवड करण्यात आलेल्या उमेदवारांना कमीत कमी तीन महिने भोजन व निवासाची मोफत सोय करावी.

७) प्रशिक्षण वर्गात प्रशिक्षणार्थ्यांस संगणक व इंटरनेट प्रशिक्षण देण्याच्या दृष्टीने इंटरनेट सुविधेसह ३० संगणक उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करावी.

८) प्रशिक्षण केंद्रातुन ज्या प्रशिक्षणार्थ्यांनी प्रशिक्षण घेतले आहे अशा प्रत्येक प्रशिक्षणार्थ्यांच्या कृतीचा तपशील, पाठपुरावा करुन प्रशिक्षण केंद्राने संकलित करुन संगणकात ठेवावा, आणि हा तपशील आवश्यक त्यावेळी उपलब्ध होण्यासाठी व्यवस्था करावी. स्पर्धा परिक्षेच्या

अभ्यासक्रमातील अद्यायावत बाबींची माहिती, प्रत्येक महिन्यात / विहित कालावधीत पाठवावी म्हणजे प्रशिक्षणार्थी स्पर्धा परिक्षेची चांगल्या प्रकारे तयारी करतील.

९) सध्या घेण्यात येत असलेल्या स्पर्धा परिक्षेनुसार, प्रवेश परिक्षा, मुख्य परिक्षा व मुलाखत या पध्दतीप्रमाणे प्रशिक्षण देण्याच्या सत्राचे नियोजन करण्यात यावे.

१०) जे उमेदवार प्रवेश परीक्षेत उत्तीर्ण होतील आणि मुख्य परीक्षेस बसणार असतील त्यांना दरमहा रु. ५००/- विद्यावेतन कमीत कमी तीन महिन्यांसाठी देण्यात यावे.

११) तज्ञ व्याख्याते उपलब्ध होण्याच्या दृष्टीने व्याख्यात्यांचे मानधन प्रतितास रु. २००/- मंजूर करावे आणि अनुभवी व आवश्यक ती योग्यता असलेला तज्ञ व्याख्याता प्रशिक्षणासाठी निवडावा.

१२) स्पर्धा परिक्षा आणि परिक्षेचे स्वरुप पाहून प्रशिक्षणाचा कालावधी बदलता ठेवावा.

१३) प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी शासकीय / निमशासकीय व विद्यापीठाच्या कर्मचाऱ्यांना व्याख्याते म्हणून बोलविण्यात यावे.

१४) अतिथी व्याख्याते म्हणून जे अधिकारी एम.पी.एस.सी. परीक्षा देऊन शासकीय सेवेत रुजू झाले आहेत तसेच ज्या खात्याचा / विषयाचा अनुभव आहे अशा अधिकाऱ्यांना व्याख्यानासाठी नियमित पाचारण करण्यात यावे.

***

# संशोधन संघ

## मार्गदर्शक

वाय.पी.एस. तोमर, भा.प्र.से.
आयुक्त,

व्ही. व्ही. देशमुख, सहसंचालक,

श्री.एस.डी.बिरासदार, उपसंचालक (एक्षेविका)

## अभ्यास करणारा चमू

डी.आर.देसले, संशोधन अधिकारी

एस.आर.शिंदे, संशोधन सहाय्यक

जी.सी.लोंढे, संशोधन सहाय्यक

के.आर.नांगरे, सांख्यिकी सहाय्यक (व)

## सहाय्यक

ए.एफ. शेरकर, उच्चश्रेणी लघुलेखक

डी.डी.गायकवाड, निम्नश्रेणी लघुलेखक

श्रीमती एस.एस.भुतकर, लघुटंकलेखक

के. पी.कुर्डे, लघुटंकलेखक